<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७४३/२०२१ मध्ये निशाणी क्र. २४ कडील अर्जावर आदेश.</u>

१) प्रस्तुत अर्ज वादींतर्फे वादी क्र. १ मोहन गणपती पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना वादी क्र. १ मोहन गणपती पाटील हे दिनांक २७/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादी क्र. १ यांना प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे १अ ते १इ हे कायदेशीर वारस आहेत. वादी क्र. १ यांना अन्य कोणीही वारस नाहीत. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, मयत वादी क्र. १ मोहन गणपती पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात यावी.

२) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी या अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना वादी क्र. १ मोहन गणपती पाटील हे दिनांक २७/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. निशाणी क्र. २३ कडील यादीसोबत दाखल केलेल्या वादी क्र. १ मोहन गणपती पाटील यांच्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. १ मोहन पाटील हे दिनांक २७/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादींनी प्रस्तुतचा वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर

घेण्याचा अर्ज हा दिनांक २३/१२/२०२२ रोजी दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज मुदतीमध्ये आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता व वरील नमूद कारणांचा विचार करता माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

१)	प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२)	वादींनी प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये करावी व त्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३)	वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.11.30 11:15:02 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक- २९/११/२०२४		२रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.